Level 2_Dusari_Listening Passage

# जय केस कापायला जातो

माझा लहान भाऊ तीन वर्षाचा आहे. एकदा माझी आई त्याचे केस कापण्यासाठी त्याला दुकानात घेऊन गेली. जयला वाटायचे केस कापले की ते दुखतील म्हणून तो दुकानात शिरण्याआधी रडायला लागला. हात पाय आपटू लागला. आईने त्याला उचलले व ती दुकानात गेली. तिथल्या बाईने जयला जवळ बोलावले आणि त्याला टाळ्या वाजवणारे माकडाचे खेळणे दिले. ते बघून जय रडायचा थांबला. माकडाची शेपटी ओढली की माकड टाळ्या वाजवे. ते बघून जय हसला. केस कापणाऱ्या बाईने जयला खुर्चीत बसवले. डोक्यावर पाण्याचा फवारा मारला. जयला गंमत वाटली. समोरच्या आरशात बघून तो वेडीवाकडी तोंडे करत होता. हसत होता. बाई त्याचे केस कापत होती. पाण्याचा फवारा मारत होती. जयला मजा वाटत होती. बाईने त्याच्या केसाचा छान भांग पाडला व पिवळा लालीपॉप दिला. केस कधी कापून झाले ते जयला कळलेच नाही.

प्रश्न

१) जय केस कापायला का घाबरत होता?

२) आई त्याला कुठे घेऊन गेली?

३) दुकानातल्या बाईने जयला कोणते खेळणे दिले?

४) बाईने केस कापताना काय केले?

५) केस कापताना जय का रडला नाही?

Level 2_Dusari_Listening Passage

## घसरगुंडी

रविवारी सकाळी माझी आई मला व माझ्या बहिणीला बागेत घेऊन गेली. बागेत झोका व घसरगुंडी आहे. माझी बहीण झोक्यावर बसली. आई तिला झोके देत होती. मी उंच घसरगुंडीवर गेलो. मी डोळे मिटले व पाय पसरून घसरू लागलो. इतक्यात घसरगुंडीच्या तळाशी एक लहान मुलगी आली. मी तिच्यावर जाऊन आदळलो. माझे डोके तिच्या डोक्यावर आपटले होते. ती मुलगी रडायला लागली. मी पण घाबरून रडायला लागलो. मला व त्या मुलीला डोक्याला छोटे टेंगूळ आले होते. माझी व तिची आई धावत आल्या. दोघींनी आमचे रडे थांबवले. डोळे पुसले व गोड गोळी दिली. नंतर मी व माझी बहीण वाळूत खेळलो. आमच्या बुटात आणि केसात वाळू गेली. घरी गेल्यावर आईने आम्हा दोघांना आंघोळ घातली.

प्रश्न

१) आई मुलांना घेऊन कुठे गेली?

२) बागेत काय आहे?

३) मुलगा कुठे खेळतो?

४) घसरगुंडीवरून घसरताना काय झाले?

५) मुलांच्या आईने मग काय केले?

Level 2_Dusari_Reading Passage

# <u>बिरबल</u>

एकदा बादशहा अकबर आणि त्याची राणी आंबे खात बसले होते. बादशहा आंबे चोखून चोखून खात होता पण आंब्याच्या साली आणि कोयी राणीसमोर टाकत होता. तिथे बिरबल आला. बादशहा म्हणाला "बघ बिरबल, माझी बायको किती खादाड आहे. तिने इतके सगळे आंबे खाल्ले." बिरबल हसून म्हणाला "महाराज, तुम्ही पण आंबे खाल्ले परंतु साली आणि कोयी देखील खाल्ल्या? आता सांगा खादाड कोण?" ते ऐकून अकबर काही बोलला नाही व हसला.

प्रश्न

१) अकबर व राणी कोणते फळ खात होते?

२) आंबे खाताना अकबर काय करत होता?

३) बादशहाने बिरबलाला काय सांगितले?

४) बिरबल काय म्हणाला?

५) तुम्ही आंब्याचे कोणते पदार्थ खाल्ले आहेत?

Level 2_Dusari_Reading Passage

# मिहीर पोहायला शिकतो

आईने मिहीरला पोहायला नेले. आधी तो खूप घाबरत होता. आईने सांगितले "अरे, पाण्यात खूप मजा येते. मी आहेच ना तुला धरायला." मिहीरने पिशवीत पोहायची चड्डी घेतली. अंग पुसायला मोठा रूमाल घेतला. दुसरे कोरडे कपडे घेतले. दोघेही तलावावर गेले व तयार होऊन पाण्यात उतरले. पाणी छान गरम होते. मिहीरने आईला घट्ट धरले. नाका तोंडात पाणी जाईल, मी बुडेन असे तो म्हणत होता. आईने दोन्ही हाताने त्याच्या खांद्याखाली धरले. "पाय मार, हात मार" सांगितले. नंतर त्याला रबराची नळी दिली. तिला पकडून मिहीर पाण्यात पुढे पुढे जाऊ लागला. इतर मुलांकडे बघून त्याची भीती कमी झाली. त्याला पोहायला मजा आली.

प्रश्न

१) आईने मिहीरला कुठे नेले?

२) मिहीरने पोहायला जाताना काय घेतले?

३) मिहीरला कशाची भीती वाटत होती? का?

४) मिहीरची भिती कमी झाली का?

५) तुम्ही पोहायला कसे शिकला?